# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, ठाणे

क्र. सामान्य /कक्ष१ / टे १/ आस्था / प्र. क्र. ५१/२०२१ दिनांक- १७.०३.२०२१

## जाहीर प्रकटन

### कंत्राटी पद्धतीने विधी अधिकारी यांची नेमणूक करणेबाबत

१. महसूल प्रशासनातील क्षेत्रिय स्तरावरील प्रलंबित असलेल्या न्यायालयीन प्रकरणांमध्ये शासनाची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी व न्यायालयीन प्रकरणांचा तातडीने निपटारा करण्यासाठी ठाणे जिल्ह्यात एक विधी अधिकारी यांची एकत्रित मानधन रुपये ३०,०००/- दूरध्वनी व प्रवास खर्च रु. ५,०००/- इतक्या ठोक मानधनावर कंत्राटी पद्धतीने ११ महिन्यांकरिता नियुक्ती करण्यासाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत असून पात्र उमेदवारांनी **मुलाखतीसाठी दिनांक <u>१५.०४.२०२१ रोजी दुपारी -१२.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे</u>** येथे उपस्थित रहावे.

| अ. क्र. | पद | एकत्रित मानधन (दरमहा) | शैक्षणिक अर्हता व अनुभव | पद संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | विधी अधिकारी | रुपये ३०,०००/- + दूरध्वनी व प्रवास खर्च रु. ५,०००/- इतक्या ठोक मानधनावर | १. उमेदवार मान्यता प्राप्त विद्यापीठाच्या कायद्याचा पदवीधर असावा व तो सनद धारक असावा.<br>२. विधी अधिकारी या पदासाठी वकिली व्यवसायाचा किमान७ वर्षाचा अनुभव आवश्यक राहील.<br>३. उमेदवार महसूल विषयक, सेवाविषयक, प्रशासनिक अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थिती तथा विभागीय चौकशी इत्यादी बाबत ज्ञानसंपन्न असावा. ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही तो कार्यक्षमतेने पार पाडू शकेल.<br>४. उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांचे पुरेसे ज्ञान असावे.<br>५. विधी अधिकारी या पदासाठी उमेदवाराचे वय नियुक्ती वेळी ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे. | १ |

**विधी अधिकारी यांची निवड :-**

विधी अधिकारी यांची निवड, जिल्हानिवड समितीच्या अखत्यारित राहिल. तसेच संबंधित जिल्हाधिकारी हे नियुक्ती प्राधिकारी असतील.

**<u>सर्वसाधारण अटी व शर्ती</u>**

१) सदरची नेमणूक ही करार (कंत्राटी) पद्धतीने असल्यामुळे त्यांना शासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.

२) सदर पदाची मुदत ११ महिने असून आवश्यकता असल्यास सदर मुदत एकावेळी ११ महिन्यांपर्यंत वाढविता येइल

३) निवड झालेल्या उमेदवारास महसूल व वनविभाग शासन निर्णय, क्रमांक : इएसबी -२०१०/ प्र.क्र. ४२/ ई-८, दिनांक ३०.०७.२०११ अन्वये **परिच्छेद- ब** मध्ये नमूद केलेला करार करुन द्यावा लागेल.

४) निवड झालेल्या उमेदवारास एकत्रित मानधन आणि अनुज्ञेय दूरध्वनी व प्रवास खर्च या व्यतिरिक्त कोणतेही भत्ते अनुज्ञेय राहणार नाही.

५) कोणत्याही प्रकारची पूर्वसूचना न देता पदावरुन कमी करण्यात येईल.

६) उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा.

७) मुलाखतीस येताना मूळ कागदपत्रे आणणे आवश्यक आहे.

८) सदर पदासाठी उमेदवाराने आपले पूर्ण नांव, टपालाचा **पूर्ण पत्ता पिनकोडसह, मोबाईल / दूरध्वनी क्र.** , **ई मेलआयडी**, जन्मतारीख, अधिवास प्रमाणपत्र , शैक्षणिकअर्हता व अनुभव विषयक माहिती (BIO DATA)